।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4 th Cycle)

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/२९३२/२०२६ दिनांक २६/०९/२०२६

**प्रति,**
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक.

**विषय:** ओएसिस (OASIS) सॉफ्टवेअरमध्ये प्राचार्य आणि प्राध्यापकांची माहिती त्वरित अद्ययावत करण्याबाबत.

महोदय/महोदया,

सर्व संलग्नित महाविद्यालयांचे मा. प्राचार्य यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, विद्यापीठाद्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या विविध परीक्षांसाठी ओएसिस (OASIS) सॉफ्टवेअर प्रणालीद्वारे 'अंतर्गत व बहिस्थ वरिष्ठ पर्यवेक्षक' यांच्या नेमणुका करण्यात येतात.

असे निदर्शनास आले आहे की, अनेक महाविद्यालयांनी त्यांच्याकडील मान्यताप्राप्त प्राचार्य तसेच प्राध्यापक यांची माहिती या सॉफ्टवेअरमध्ये अद्ययावत केलेली नाही. त्यामुळे, प्रणालीत उपलब्ध असलेल्या जुन्या माहितीच्या आधारेच नेमणूक आदेश पाठवले जात आहेत. परिणामी, मयत झालेले, सेवानिवृत्त झालेले किंवा सध्या महाविद्यालयात कार्यरत नसलेल्या अध्यापकांनाही कामकाजाचे आदेश पाठविले जात असतात. यामुळे ऐन परीक्षेच्या वेळी नियोजनात गंभीर अडचणी निर्माण होत असून परीक्षांचे कामकाज प्रभावित होत आहे.

तरी, सर्व महाविद्यालयांना विनंती करण्यात येते की, दि.5 ऑक्टोबर,2026 किंवा तत्पूर्वी ओएसिस सॉफ्टवेअरमध्ये आपल्या महाविद्यालयातील सर्व कार्यरत व मान्यताप्राप्त प्राचार्य आणि प्राध्यापकांची माहिती अचूकपणे अद्ययावत करावी. तसेच, जे प्राध्यापक मयत, सेवानिवृत्त झाले आहेत किंवा ज्यांनी काम सोडले आहे, त्यांची नावे प्रणालीतून तात्काळ वगळण्याची (Deactivate/Remove) कार्यवाही करावी.

विहित मुदतीत माहिती अद्ययावत न केल्यास आणि त्यामुळे परीक्षांच्या कामकाजात कोणतीही अडचण निर्माण झाल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

परीक्षांचे कामकाज सुरळीत व वेळेवर पार पाडण्यासाठी सर्व महाविद्यालयांनी विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू,

**(प्रा. योगेश ना.पाटील)**
**संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**प्रत-माहिती व कार्यवाहीसाठी :**

१) उपकुलसचिव, परीक्षा व मूल्यमापन मंडळ (विज्ञान व शिक्षणशास्त्र, तंत्रज्ञान, औषधीनिर्माण, आर्किटेक्चर,मानवविज्ञान आणि आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा) क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
२) उपकुलसचिव, परीक्षा व मूल्यमापन मंडळ (वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखा,रेकॉर्ड,परीक्षा गैरप्रकार चौकशी,पदवीप्रदान विभाग ), क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
३) परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या सर्व विद्याशाखा उपविभागांचे प्रमुख/नियंत्रक अधिकारी व कर्मचारी, क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव

**प्रत माहितीसाठी सविनय अग्रेषित.**

१.मा. कुलगुरु महोदयांचे कार्यालय, कबचौउमवि, जळगाव २.मा. प्र-कुलगुरू, कबचौउमवि, जळगाव
२.सर्व विद्याशाखांचे मा.अधिष्ठाता/प्र.अधिष्ठाता, प्र.सहयोगी अधिष्ठाता, कबचौउमवि, जळगाव
३) परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे सन्माननीय सदस्य, कबचौउमवि, जळगाव
४) निर्मल सॉफ्टवेअर कंपनीचे प्रतिनिधी.